संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# खरा लोकराजा शाहु महाराज

**गुलामी** ही परकीय शासकांकडून जशी निर्माण होते. तशीच ती स्वकीयांकडूनही निर्माण केली जाऊ शकते. फक्त त्यात थोडा फरक असा असतो. परकीयांच्या राज्यात शारीरिक गुलामीचा त्रास होतो तर स्वकीयांकडून मानसिक गुलामगिरीतून छळ करण्याचा प्रयत्न होतो. अर्थात स्वकीयांमध्ये त्या मनोवृत्तीच्या काही सामाजिक घटकांचाही समावेश होतो. भारतात मोगल गेल्यानंतर ब्रिटीश गेल्यानंतर समाजातल्या विशिष्ट घटकाला मानसिक गुलामगिरीचा मोठा सामना करावा लागला. आणि मग अशा मनुष्य किंवा समाजनिर्मित गुलामगिरीला विरोध करण्यासाठी काही युगपुरुषांना संघर्ष करावा लागला. अशा युगपुरुषांमध्ये अग्रणी राहिलेले आणि विशेष म्हणजे परंपरेने राजेपणाचा वारसा मिळूनही सामाजिक गुलामगिरीविरुध्द झगडण्याचा प्रयत्न करणाऱ्या शाहु महाराजांचा समावेश होतो. आज त्यांची पुण्यतिथी आहे. ७३ वर्षापूर्वी या सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ ठरलेल्या शाहु महाराजांचे मुंबईतल्या खेतवाडी इथल्या बंगल्यामध्ये हृदयविकाराने निधन झाले होते. त्यांना लोकराजा असे बिरूदही सन्मानाने बहाल झाले होते. म्हणजे १८ व्या शतकामध्ये महात्मा ज्योतिबा फुलेंनी स्वाभिमान आणि समतेचे बीजारोपण केले. परंतु या समतेच्या वृक्षाची जोपासना छत्रपती शाहूंनी केली. असे विशेषत्वाने म्हटले जाते की शाहु महाराजांच्या या समता स्थापन करण्याच्या प्रयत्नांमुळेच केशवराव जेधे , भाऊराव पाटील, बाबासाहेब आंबेडकर अशी तितकीच दिग्गज आणि सुधारणा चळवळीचे अग्रणी समाजाला लाभले. परंपरेने साचेबंद समाजव्यवस्थेत विषमता आणि अन्यायाने पिचलेल्या समाजातल्या विशिष्ट घटकाला जागृत करण्याचे काम शाहु महाराजांनी केलेच. परंतु त्यांना स्वाभिमानाने जगता यावे म्हणून त्यांच्यासाठी शिक्षण आणि विकासाच्या अनेक वाटा खुल्या करण्याचे ऐतिहासिक काम छत्रपती शाहुंनी करून दाखवले. त्यांच्या नेतृत्वाखालच्या सत्यशोधक चळवळीने शिक्षणाचा आग्रह धरून प्रत्यक्ष कृती करून दाखवली. १९०३ ते ०४ च्या सुमारास कोल्हापूर संस्थानातील शाळांची संख्या दुप्पट करण्याचे छत्रपती शाहुंचे कर्तृत्व म्हणजे एक विलक्षण झेप म्हणावी लागते. कारण त्या काळात म्हणजे शंभर वर्षापूर्वी प्राथमिक शिक्षण घेणाऱ्यांची संख्या साडेपाचेशेवरून एकवीस हजारापर्यंत त्यांनी नेली होती. त्यांचा हा शिक्षण प्रयोग समाजातल्या उच्चवर्णियांना सर्वात मोठा धडा देणारा ठरला.

### वसतीगृहे सुरू केली

केवळ शिक्षणाचा पुरस्कार केला असे नाही तर हे शिक्षण घेणे अनेक वर्षे दबलेल्या घटकांना सहजपणे कसे उपलब्ध होईल अशी व्यवस्था उभी करण्यातही त्यांनी अपार कष्ट घेतले. पैसाही खर्च केला. म्हणजे त्याकाळात तेवीसपेक्षा जास्त वसतीगृहे सुरु करून शिवाय इतर भागातील वसतीगृहांना आर्थिक मदतही त्यांनी केली. समाजातली जातीव्यवस्था गेली पाहिजे. हे जरी खरे असले तरीसुध्दा ती दूर करण्यासाठी तितकेच कठोर निर्णय घेण्याची त्यावेळेला आवश्यकता होती. त्या काळी वापरला जात असणारा अस्पृश्य त्यांनी एक राजाज्ञा काढून रद्द ठरवला. याचा अर्थ लोकांच्या मनात असलेली ही भावना दूर करण्याचे तितकेच मोठे धाडस त्यांनी दाखवले होते. म्हणजेच वर्णव्यवस्था बदलवायची असेल तर समाजाची मनोवस्थासुध्दा बदलावी लागेल. शब्दांच्या वापरांपासून ते समाजातल्या व्यवहारांमध्ये अनेक बदल घडवून आणावे लागतील हे छत्रपती शाहुंनी अनेक प्रकारच्या निर्णयांमधून दाखवून दिले. आंतरजातीय विवाहासारखा प्रयोग त्यांनी आपल्या घरातूनच सुरु केला. आपल्या चुलत बहिणीचा विवाह त्यांनी इंदोरच्या होळकर महाराजांच्या मुलाशी घडवून आणला होता. याचा अर्थ विचार आणि व्यवहार यांना ते समान महत्व देत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाचा त्यांनी वेळोवेळी गौरव केला होता एवढेच नव्हे तर मुंबईत येऊन आंबेडकर ज्या चाळीत राहात होते तिथे त्यांची भेटही घेतली. म्हणूनच त्यांना गौरव करताना एका ठिकाणी डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यांना लाभलेला शाहु महाराजांसारखा सखा अशा शब्दात त्यांचे वर्णन केले होते. विशेष म्हणजे सर्व प्रकारच्या साधनांचा आणि माध्यमांचा उपयोग करीत समतेचा विचार पुढे नेण्याचे त्यांचे हे कार्य निश्चितच महत्त्वपूर्ण ठरते. आज आपण ज्या समतेच्या कृतीचे समर्थन करतो ती कृती प्रत्यक्ष करून दाखवण्याचे काम शंभर वर्षापूर्वीच त्यांनी केले होते हे लक्षात घेतले पाहिजे.

### अजुनही आर्थिक विषमता

खरे सांगायचे तर फुले, शाहु, आंबेडकर अशी जी काही खऱ्या अर्थाने समता स्थापन करणारी किंवा चळवळ सुरु करणारी त्रिमूर्ती होती. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन हे केवळ अनुकरणातूनच होऊ शकते. समाजाला त्या काळामध्ये नवी दृष्टी देण्याची त्यांनी केलेली कामगिरी म्हणजे विपरित काळामध्ये प्रबोधनाचे महत्त्वलोकांपर्यंत पोहचवण्याचा तो सर्वात मोठा वसा होता. केवळ आपापल्या परिसरापुरते कार्य करीत न राहाता देशभर या विचारांचे लोण कसे पोहचेल आणि विचारांबरोबर प्रत्यक्ष कृती कशी घडेल याचे भान त्यावेळी या लोकांनी ठेवले. म्हणूनच जनतेने त्यांचे नेतृत्व स्वीकारले त्यांच्याविषयीचा अपार आदर लोकांच्या मनामध्ये निर्माणही झाला. आज जाती व्यवस्थेचा प्रभाव सामाजिक क्षेत्रात जवळपास नाहीसा झाला आहे पण राजकारण्यांनी तो आपल्या स्वार्थासाठी जोपासलेला दिसून येतो. कदाचित त्यामुळेच आजची आर्थिक विषमताही नष्ट झालेली नाही असे म्हणावे लागते. सार्वजनिक संपत्तीचे आजही विषम वाटप होते. एका विशिष्ट वर्गाकडे पैशाचा प्रचंड ओघ सुरु असल्याचे पाहायला मिळते. एवढेच नव्हे तर सरकारी तिजोरीतून होणाऱ्या सुविधासुध्दा अजूनही ग्रामीण भागातल्या वंचित घटकांपर्यंत पोहचवल्या जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे अशावेळी या राजकारण्यांना शाहु - आंबेडकरांचे नाव घेण्याचा नैतिक अधिकारही राहात नाही. म्हणूनच ज्यांनी आपले आयुष्य सामाजिक समतेच्या स्थापनेसाठी खर्ची घातले लोकांनी स्वतः हून ज्यांना राजा ही पदवी दिली. अशांचे विचार प्रत्यक्षात आणायचे असतील तर केवळ लोकशाहीने निवडून आलेले राजे नकोत. तर लोकांनी आदराने स्वीकारलेल्या राजांची आज आवश्यकता आहे.